GOLDEN RESEARCH THOUGHTS

ISSN: 2231-5063
IMPACT FACTOR : 4.6052 (UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 7 | JANUARY – 2017



# "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अखंड भारतासाठी अभिप्रेत असलेली लोकशाही"

प्रा. डॉ. पी. आर. जाधव
मराठी विभागप्रमुख ,
स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालय, नांदगाव पेठ ता. जि. अमरावती.

**प्रस्तावना:-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलितांच्या चळवळीचे प्रमुख नेते, व्यासंगी विचारवंत स्वतंत्र भारताच्या घटनेचे शिल्पकार म्हणून सर्वांना परिचित आहेत. या क्रियाशील विचारवंताने पूर्व अस्पृश्यांच्या हक्कासाठी संघर्ष करीत असताना हिंदू समाज व्यवस्थेत अमलाग्रह सुधारणा घडवून आणण्यासाठी सतत प्रयत्न केले. समाज जीवनात विरोधी निर्माण होणाऱ्या प्रश्नांचा शास्त्रशुद्ध विचार करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपले व्यक्तिमत्व आणि कार्य यामुळे विसाव्या शतकातील भारतातील महापुरुष होते. याबाबत दुमत होण्याचे कारण नाही.

प्रस्तुत शोधनिबंधामधून येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अखंड भारतासाठी अभिप्रेत असलेल्या लोकशाहीची विशेष लक्षात घ्यावयाचे आहेत. त्यांच्या अखंड भारतासाठी लोकशाहीविषयक विचार समजून घेण्यापूर्वी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. ती ही की डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे बैठे तत्त्वचिंतक नव्हते तर कृतिशील विचारवंत होते. वेळोवेळी निर्माण झालेल्या परिस्थितीला त्यांना प्रतिसाद द्यावा लागत होता. अशा प्रासंगिक प्रतिसादात आखीव रेखीव सुसंगतीची अपेक्षा करता येत नाही. त्याचप्रमाणे त्यांच्या सुट्या सुट्या वैचारिक प्रतिक्रियांचा वापर आपले वैचारिक घोडे दामटण्यासाठी करणे हेही योग्य ठरत नाही. त्यांच्या एकूण विचार विश्वाचा शोध घेऊन या विश्वाचा गाभा लक्षात घेणे हीच अभ्यासाची योग्य रीत ठरते.

प्रथम अमेरिका आणि नंतर लंडन येथे उच्च शिक्षण घेत असताना उदारमतवादी तत्त्वज्ञानातील स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, बुद्धिनिष्ठा आणि लोकशाही मूल्ये त्यांच्या मनात खोलवर रुजली. परदेशातील शिक्षणाच्या काळात त्यांनी निरनिराळ्या सामाजिक विषयांचा शास्त्रशुद्ध व ऐतिहासिक पद्धतीने अभ्यास करण्याची सवय स्वतःला लावून घेतली होती. उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत

वास्तव्य असताना तेथे लोकशाही तत्त्वज्ञानाचा विकास करणाऱ्या जॉन ड्यूई या विचारवंताच्या तत्त्वज्ञानाचा त्यांच्यावर प्रभाव पडला आणि लोकशाहीची मूल्ये त्यांनी मनोमन स्वीकारली. जॉन ड्यूईंच्या मते-

"लोकशाहीमध्ये राज्यव्यवस्थेला प्राधान्य असते हे तर खरेच, पण लोकशाही हा केवळ राज्य व्यवस्थेचा एक प्रकार नाही. ती एक जीवनपद्धती आहे. म्हणून लोकशाहीवर श्रद्धा असणाऱ्यांना सामाजिक व्यवस्थेचा विचारही टाळता येणार नाही. लोकशाहीत संघटनेचे स्वातंत्र्य असल्यामुळे शांततामय मार्गाने सामाजिक व आर्थिक बदल घडवून आणण्यासाठी नागरिक एकत्र येऊन परस्पर सहकार्याने कृती करू शकतात"(१) या विचारांनी प्रभावीत झालेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाहीची मूल्य स्वीकारून भारतात हळूहळू विकसित होत जाणाऱ्या राजकीय लोकशाहीला सामाजिक लोकशाहीची जोड देण्यासाठी जन्मभर कार्य केले. फ्रेंच राज्यक्रांतीतून आलेली आणि पाश्चात्य उदारमतवाद्यांनी आपल्याशी केलेली स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव ही मूल्य सर्वांगीण लोकशाहीला आधारभूत असतात. या तत्त्वत्रयीविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या भाषणातून आणि लेखनातून स्पष्ट विवेचन केलेले आहे. न्यायाधीष्टीत समाज व्यवस्थेची स्थापना करणे हे जे ध्येय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उराशी बाळगले होते, त्याला ही तत्वे पायाभूत असतात हे त्यांनी वारंवार म्हटले आहे.

### स्वातंत्र्याचे प्रकार:-

स्वतंत्र चे दोन प्रकार आहेत. नागरी स्वातंत्र्य आणि राजकीय स्वातंत्र्य, नागरी स्वातंत्र्यात कायद्याच्या प्रक्रियेशिवाय अटक न होण्याचे स्वातंत्र्य, विचार, वाचन, लेखन, भाषण यांचे स्वातंत्र्य आणि कृतीचे स्वातंत्र्य यांचा समावेश होतो. परंतु कृतीचे स्वातंत्र्य उपभोगण्यासाठी माणसापाशी साधने असावी लागतात. जेथे पिळवणूक, एका वर्गाकडून दुसऱ्या वर्गाची दडपणूक, बेकारी, दारिद्र्य नसते तिथेच खरे स्वातंत्र्य असू शकते हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वेळोवेळी स्पष्ट केले आहे.

### राजकीय स्वातंत्र्य;-

राजकीय स्वातंत्र्य म्हणजे कायदा करण्याचा आणि सरकार बनवण्याचा अथवा पाडण्याच्या प्रक्रियेत सहभागी होण्याचा हक्क. शासन संस्था असते.

अस्तित्वात आली ती प्रत्येक माणसाचा जगण्याचा, स्वातंत्र्याचा, सुख संपादनाचा हक्क अबाधित राहावा यासाठी. ज्यांच्या हक्काचे संरक्षण करणे हे शासनाचे कर्तव्य असते त्यांनाच ते शासन जबाबदार असले पाहिजे. शासनाचे अस्तित्व, सामर्थ्य व सत्ता शासितांच्या संमतीवर अवलंबून असणे आवश्यक आहे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात.

### समता:-

'समता म्हणजे काय?'वरवर पाहिले तर माणसा माणसात अनेक भेद दिसून येतात. पण हे भेद बाजूला सारल्यावर सर्व माणसांमध्ये काही समान प्रवृत्ती आढळतात. दुर्बलांना छळण्याचा नैतिक अधिकार बलवंतना आहे असे आपण मानत नाही. सर्व माणसे परमेश्वराने मूलतः समान निर्मिती आहेत, ही माणसाच्या मनातील श्रद्धा आहे.

"मानवी व्यक्तिमत्त्वाला हा मान दिला नाही तर समाजही एक चोराची टोळी बनेल"(२) असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आग्रहाने प्रतिपादन केले आहे.

**बंधूभाव:-**

बंधूभाव हे मूल्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अत्यंत महत्त्वाचे वाटत असे. हे त्यांच्या लिखाणातून जाणवते. बंधुभाव म्हणजे समाजातील इतर व्यक्तींबद्दल आदरभाव. प्रेम आणि ऐक्याविषयीची तळमळ म्हणजे बंधुभाव. सामाजिक ऐक्याला नेहमी बंधूभावाचे अधिष्ठान असते, त्यामुळेच प्रत्येक माणसाला दुसऱ्याच्या हिताचा विचार करण्याची इच्छा होते.

इतरांबद्दल माणसाच्या मनात सहानुभूती नसेल तर समाजात सुसंवाद राहणार नाही. जेथे बंधुभाव नसतो तिथे प्रत्येक मनुष्य दुसऱ्याला आपला प्रतिस्पर्धी मानतो. ही तीन तत्त्वे लोकशाहीला प्राणाभूत असतात अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धारणा आहे.

**सामाजिक लोकशाही:-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाही हा केवळ शासनाचा एक प्रकार असे कधीच मानले नाही. त्यांना लोकशाही हा समाज व्यवस्थेचा प्रकार म्हणून महत्त्वाचा वाटे. सामाजिक लोकशाही नसेल तर राजकीय लोकशाहीवर आधारलेल्या घटनेचा काहीच उपयोग नाही.

लोकशाही समाज अस्तित्वात येण्यासाठी समाजातील इतर व्यक्तींबद्दल प्रत्येकांच्या मनात समानतेची व आदराची भावना असली पाहिजे. समाज व्यवस्थेत अनुल्लंघनीय अशा भिंती असता कामा नयेत. निरनिराळ्या गटांचा बंदिस्तपणा आणि विशेषाधिकार असलेले गट या बाबी लोकशाहीला सुसंगत नाहीत, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आवर्जून म्हटलेले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदूंचीधर्मशास्त्रे आणि हिंदू समाज व्यवस्था यांची सामाजिक समतेच्या कसोटीवर चिकित्सा केली. स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या तत्त्वांना चातुर्वर्ण्यांवर व जातीभेदावर आधारलेल्या हिंदू धर्मात विरोध आहे हे त्यांनी स्पष्ट केले. त्यांची काळाराम मंदिर, महाड येथील चवदार तळ्यातील पाणी यासंदर्भात जी आंदोलने झाली ती हिंदू समाजाने स्वातंत्र्य, समता हे मूल्य स्वीकारावी यासाठी झाली. परंतु हिंदू धर्म बदलणे शक्य नाही हे जाणल्यावर त्यांनी 1956 मध्ये हिंदू धर्माचा त्याग करून बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. त्यांना बौद्ध धर्म लोकशाहीशी सुसंगत वाटला. त्यात जन्मसिद्ध विषमतेची कल्पना त्यांना आढळली नाही. तथागत गौतम बुद्धांच्या प्रज्ञा- करुणा- समता या तत्त्वांचा त्यांनी 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथात सामाजिक लोकशाहीच्यादृष्टीने अर्थ लावून दाखवला. "डॉ. बाबासाहेब आंबेडकर लोकशाहीचे पुरस्कर्ते असल्यामुळे दुसऱ्या महायुद्धात लोकशाही व्यवस्था असलेल्या ब्रिटिश सरकारशी आपण सहकार्य केले पाहिजे अशी भूमिका त्यांनी घेतली"(३) हे युद्ध लोकशाही विरुद्ध हुकुमशाहीशी असे होते.

## राजकीय लोकशाहीसाठी आवश्यक असलेल्या तरतुदी

लोकशाही हे लोकांसाठी शासन आहे. पण ते लोकांचे शासनही आहे. केवळ मतदार झाल्याने भागत नाही. कायदे करणे आवश्यक असते, अन्यथा कायदे करणारे मतदान करणाऱ्यांचे मालक बनतात. हा मुद्दा स्पष्ट करून अल्पसंख्याकांना सत्तेत सहभाग मिळावा यासाठी काही तरतूद असली पाहिजे यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रयत्न केले.

## शासकीय समाजवादाचे तत्व:-

अखंड भारतात लोकशाही यशस्वी व्हायची असेल तर सामाजिक लोकशाही अशी आवश्यक तशीच आर्थिक परिस्थिती अनुकूल असावी लागते. त्यासाठी राज्यघटनेत शासकीय समाजवादाच्या तत्त्वाचा समावेश करणे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आवश्यक वाटत होते. मूलभूत हक्क घटनेस सामील करण्यामागे एकाने दुसऱ्याच्या स्वातंत्र्यावर आक्रमण करू नये हा हेतू असतो. परंतु प्रत्यक्षात खाजगीकरणाच्या अर्थव्यवस्थेत बलदंडांना म्हणजे जमीनदारांना, कारखानदारांना, व्यापाऱ्यांना शोषण करणाऱ्यांचे स्वातंत्र्य हाच अर्थ निघतो. हे होऊ नये यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेत शासकीय समाजवाद आणावा अशी सूचना केली होती.

मूलभूत उद्योग व शेतजमीन यांचे राष्ट्रीयकरण करावे हे त्यांचे मत होते. घटनेत सामाजिक समाजवादाचा अंतर्भाव करावा असे म्हणण्यामागचा हेतू हा की त्यामुळे सरकार बदलले तरी धोरणाचे सातत्य कायम राहते. हुकूमशाहीत शासकीय समाजवादाला शाश्वती मिळेल पण व्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच होईल. उदारमतवादातील व्यक्तीस्वातंत्र्य, व्यक्तीप्रतिष्ठान हे मूल्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना फार महत्त्वाचे वाटत होते. ज्यांना स्वातंत्र्याची चाड आहे ते सांसदीय लोकशाहीचा त्याग करण्यास तयार नसतात असे ते म्हणतात. तेव्हा सांसदीय लोकशाही कायम ठेवून घटनेंमध्ये शासकीय समाजाच्या तत्त्वाचा समावेश केला तर समाजवाद आणणे, हुकूमशाही टाळणे, सांसदीय लोकशाही सुरक्षित ठेवणे ही तिन्ही उद्दिष्टे सफल होतील असा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा एकंदर लेखनाचा निष्कर्ष आहे.

## द्विपक्षीय लोकशाही:-

सांसदीय लोकशाहीत प्रातिनिधिक सरकार हे सर्वत्र कोणत्याही एका पक्षाचे असते. पक्षीय शासनाचा उत्तम प्रकार म्हणजे द्विपक्षीय लोकशाही होय. हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते. तिच्यामधून सरकार जबाबदार व स्थिर राहते. द्विपक्षीय लोकशाहीत मंत्रिमंडळाला आपली दूरगामी धोरणे राबवण्यासाठी संसदेत बहुमताचा पाठिंबा मिळतो. जेव्हा अनेक पक्ष असतात तेव्हा लहान गट सत्तेसाठी तत्वशून्य तडजोडी करतात. त्यातून आघाडीची सरकारे बनतात. ती स्थिर राहू शकत नाही असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले आहे. प्रत्यक्षात आज भारतात प्रादेशिक पक्षांचा वरचष्मा असून त्यांच्या सौधेबाजीमुळे सरकार कायम अस्थिर व हतबल अवस्थेत असल्याचे दिसून येते. आघाडी सरकार यांना आज पर्याय नाही असे त्यांनी म्हटले आहे.

दिनांक 26 जानेवारी 1950 पासून भारत एक स्वतंत्र, सार्वभौम लोकशाही राष्ट्र झाल्याचे जाहीर करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना घटनेचा मसुदा तयार करण्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीचे अध्यक्ष होते. घटना समितीचे कामकाज

दिनांक 25 नोव्हेंबर 1949 या दिवशी संपले त्या अखेरच्या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या प्रभावी भाषणातले मुद्दे संक्षेपाने उदधृत करून या शोध निबंधाची सांगता केली आहे.

### आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले-

"आपण आपले स्वातंत्र्य जपले पाहिजे. जी लोकशाही आपण स्थापन करणार आहोत ती टिकून धरता येईल का हाही एक प्रश्न आहे. भारतात पूर्वी गणराज्ये अस्तित्वात होती. पुढे ही लोकशाही नष्ट होऊन राजेशाही आली. तिची पुनरावृत्ती तर होणार नाही? तिचे बाह्य स्वरूप कायम राहून वास्तवात ती हुकूमशाही होईल अशी मला भीती वाटते. भारतात अखंड लोकशाही टिकून राहायचे असेल तर काही बंधने स्वीकारली पाहिजेत. आपली सामाजिक व आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी घटनात्मक मार्गांचाच नेहमी चिकटून राहिले पाहिजे.

एखादा नेता कितीही महान असला तरी त्याला विभूती बनवू नये. अशा भक्तीतून लोकशाहीचा ऱ्हास होऊन हुकूमशाहीची स्थापना होईल. अखंड भारतात राजकीय लोकशाही यशस्वी व्हायची असेल तर तिला सामाजिक लोकशाहीची जोड द्यावी लागेल. याचा अर्थ सामाजिक जीवनाच्या सर्व क्षेत्रात स्वातंत्र्य, समता व बंधुभाव ही तत्वे आपण स्वीकारली पाहिजेत. सामाजिक क्षेत्रात आपल्याकडे जन्मसिद्ध विषमतेवर आधारलेली जातीची उतरंड आहे, तर आर्थिक क्षेत्रात काही लोकांकडे खूप संपत्ती आहे आणि बरेचसे लोक दारिद्र्यात खितपत पडत आहेत. सामाजिक व आर्थिक क्षेत्रात सर्व माणसाचे मूळ आपण सारखेच मानले नाही तर राजकीय क्षेत्रातल्या 'एक माणूस एक मत'या मुलाला काही अर्थ उरणार नाही. ही विसंगती आपण लवकरात लवकर नाहीशी केली पाहिजे"(४)

त्यासाठी प्रत्येक भारतीयांनी अखंड भारतासाठी प्रत्यक्षात त्या दिशेने वाटचाल करीत आहोत का याचा अंतर्मुख होऊन विचार करण्याची आज वेळ आलेली आहे.

### संदर्भ टिपा:-

(1) R Koanvitz-Dewey's revision of John Dewey-Philosopher of science and freedom Ed Sydney Hook-The dial press 1950 new york, P.no. 85.

(2) Dr. Ambedkar writings and speeches,Vol.3.P.no.97.

(3) Keer Dhananjay, Dr. B.R. Ambedkar,P.No.351.

(4) Dr. Ambedkar Consstifaent Assembly -writings and speeches,Vol.13,P.No.1214-1218.

(5) 'Dhananjay Keer' Dr. Babasaheb Ambedkar' popular Prakashan, Mumbai 2009.